# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(;महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ .)

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
**डॉ. जे. व्ही. दडवे**
संचालक (प्रभारी)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)
फोन:०७१३२.२२३३२२ फॅक्स क्र ०७१३२.२२३३२२
**Email :** bcud.gondwanauniversity@gmail.com
**web:** gondwana.digitaluniversity.ac
**web:**unigug.org

**जा. क्र/बि.सी.यू.डी./ ८५। /२०१७** **दिनांक : २२/०२/२०१७**

**प्रति,**

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय : दिनांक २७/०२/२०१७ रोजी आपल्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांत **'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगीक छळ संरक्षण'** (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम–२०१३ विषयी घ्यावयाच्या कार्यशाळेबाबत.

संदर्भ : मा. डॉ. मंजुषा सुभाष मोळवणे, उपसचिव, महाराष्ट्र राज्य महीला आयोग यांचे पत्र क्र. ममआ/महा.का./२०१७/का–३/२७६, दिनांक १८/०२/२०१७

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य महीला आयोग यांचेद्वारे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या **'विशाखा मार्गदर्शक तत्वे'** अनुसार कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगीक छळ संरक्षण' (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम –२०१३ या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक कार्यालयात महिलांच्या निवारणासाठी **'अंतर्गत महिला निवारण समिती'** (Internal Complaint Committee-ICC) स्थापन करणे अनिवार्य आहे.

सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी कायद्याबद्दल जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात दिनांक २७/०२/२०१७ रोजी एक दिवशीय कार्यशाळा घेण्याबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविलेले आहे. सदर कार्यशाळेचे आयोजनाकरिता प्रत्येक महाविद्यालयास रूपये ५,०००/– वित्तीय सहाय्य महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयामार्फत देण्यात येणार आहे.

तथापी महाविद्यालयात दिनांक २७/०२/२०१७ रोजी संदर्भीय पत्रानुसार सदर विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करावे तसेच कार्यशाळेचा अहवाल विद्यापीठ व संदर्भीय पत्रामध्ये नमुद केल्यानुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई येथे आवश्यक ते कागदपत्रे जोडून सादर करावा, ही विनंती.

सधन्यवाद!

सहपत्र:– संदर्भीय पत्र

संचालक, (प्रभारी.)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली (म.रा.)

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
आवक क्र. 4367 दिनांक 21/02/17
जावक क्र. ............ दिनांक ............

MOST URGENT

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
परिक्षा नियंत्रक कार्यालय
आवक क्र. 801 दि. 21/2/17
जावक क्र. ............ दि. ............

Maharashtra State Commission for Women, Mumbai
सन्मान हक्क
महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission For Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
कलानगर, पोटमाळा, बांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474/2659 1980/2659 0806/2659 0878, 26591142
Website : www.mahilaayog.maharashtra.gov.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.) Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक : ममआ/महा.का./२०१७/का-३/276
दिनांक : १८/०२/२०१७

प्रति,
मा.कुलगुरु,
गोंडवाना विद्यापीठ,
जिल्हा गडचिरोली.

विषय :- दि.२७.०२.२०१७ रोजी आपल्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांत 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३ विषयी घ्यावयाच्या कार्यशाळेबाबत.
संदर्भ : - UGC Regulations २०१५(Sexual Harassment of Women employees and Student)

महोदय/महोदया,

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या 'विशाखा मार्गदर्शक तत्वे' अनुसार 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम - २०१३ या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक कार्यालयात महिलांच्या तक्रार निवारणासाठी 'अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती' (Internal Complaimt Committee-ICC) स्थापन करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने सदर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तसेच कायद्याबद्दल जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध विद्यापीठांमध्ये एक दिवशीय कार्यशाळा यशस्वीरित्या घेण्यात आल्या. सदर कार्यशाळेत संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, ICC अध्यक्षा, सदस्या यांना या कायद्याविषयी संपूर्ण माहिती देण्यात आली आहे.

कार्यशाळेत दिलेल्या सुचने प्रमाणे प्रत्येक महाविद्यालयाचे प्राचार्य व 'अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती (ICC)' यांनी दि.२७.०२.२०१७ रोजी आपापल्या महाविद्यालयात उपरोक्त विषयी कार्यशाळा घेण्यात यावी. याकरीता प्रत्येक महाविद्यालयास रु.५०००/- वित्तीय सहाय्य देण्याचे मा.अध्यक्षा, महिला आयोग यांनी सुचित केले आहे. सदर कार्यशाळेमध्ये जाणीवजागृती अभियान

राबविण्याकरीता खालील प्रमाणे अंदाजे अंदाजपत्रकाच्या अधिन राहून खर्च करणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील | | खर्च रुपये |
|---|---|---|---|
| १. | साधन व्यक्ती मानधन | एक सत्र | ७५०/- |
| २. | चहा-बिस्किट | रु.१० X २५० = | २५००/- |
| ३. | पोस्टर्स | रु.१००X ५ = | ५००/- |
| ४. | बॅनर | रु.८००X १ = | ८००/- |
| ५. | अनुषंगिक खर्च | | ४५०/- |
| | एकूण | | ५०००/- |

सदर अभियान दि.२७.०२.२०१७ रोजी पार पाडल्यानंतर महाविद्यालयांना कार्योत्तर आर्थिक सहाय्य महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयामार्फत देण्यात येणार आहे. याकरीता महाविद्यालयांनी खालील प्रमाणे तपशीलाची पूर्तता करावी.

१. प्राचार्य यांचे सहीचे अनुदान मिळणेबाबत महिला आयोगास पत्र.
२. कार्यक्रमाचे अहवाल, फोटो (५), सीडी.
३. खर्चाची मूळ देयके
४. महाविद्यालयाचे बँक खाते क्रमांक, पत्ता व आयएफसी कोड नंबर.
५. महाविद्यालयाचे कॅन्सल चेकची झेरॉक्स प्रत.
६. उपस्थित विद्यार्थ्यांचे खालील तक्त्यानुसार मूळ नोंदणी पत्रक.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नांव | वर्ग | ई-मेल | मोबाईल नं. | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

याकरीता महाविद्यालयांनी दि.२७.२.२०१७ रोजी कार्यशाळा झाल्यानंतर उपरोक्त तपशीलाची पूर्तता करुन कार्यशाळेचा खर्च व अहवाल आयोग कार्यालयास दि.५.३.२०१७ पूर्वी सादर करावे. तसेच **उपरोक्त कार्यशाळा घेणे महाविद्यालयांना अनिवार्य असल्याबाबत आपल्यास्तरावरुन कळवावे**, ही विनंती.

आपली,

(डॉ.मंजूषा सुभाष मोळवणे)
उपसचिव

SUNITA/Dell/Sunita1-DS-University Prog.-Colleges fund-N-L